महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव**
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com फोन क्र. ०२४७२- २९७४४०

जा.क्र.शावैमधा/स्वी.स./वैज्ञा. आणि शोधनिबंध समिती/ 1797 /२०२६ दि:- 09 /०६/२०२६

**कार्यालयीन आदेश :-**

विषय :- वैज्ञानिक आणि शोधनिबंध पडताळणी (Scientific & Research paper verification) करीता समिती गठीत करणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. शावैमधा/आस्था-१,२/ २५९०/२०२५ दि. २५/०७/२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथील सहाय्यक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदावर आणि सहयोगी प्राध्यापक पदावरुन प्राध्यापक या पदावर पदोन्नतीसाठी वैज्ञानिक आणि शोधनिबंध प्रमाणपत्र देताना शोधनिबंध पडताळणी करणे अनिवार्य असल्याने तसेच वैद्यकीय विद्यार्थी व अध्यापक वर्ग यांच्याकडून वेळोवेळी केल्या जाणाऱ्या संशोधन कार्याची गुणवत्ता तपासण्याकरिता खालील समितीमध्ये प्रशासकीय कारणास्तव अंशतः बदल करण्यात येत आहे. सदर समिती खालील प्रमाणे आहे.

<u>वैज्ञानिक आणि शोधनिबंध प्रकाशित पडताळणी (Scientific & Publication) समिती</u>

| अ.क्र. | अधिकारी आणि कर्मचारी यांचे नाव | विभाग व पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|---|
| १. | डॉ. विशाल इंदुरकर | विभागप्रमुख तथा प्राध्यापक, त्वचारोगशास्त्र विभाग | अध्यक्ष |
| २. | डॉ. ज्योती डावळे | विभागप्रमुख तथा सहयोगी प्राध्यापक, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभाग | सदस्य सचिव |
| ३. | डॉ. ऋषीकेश हरिदास | विभागप्रमुख तथा सहयोगी प्राध्यापक, औषधवैद्यकशास्त्र विभाग | सदस्य |
| ४. | डॉ. प्रविणकुमार गोवंदे | सहयोगी प्राध्यापक, बधिरीकरणशास्त्र विभाग | सदस्य |
| ५. | डॉ. योगिता सुलक्षणे | सहयोगी प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र विभाग | सदस्य |
| ६. | डॉ. अभिजीत आचार्य | सहयोगी प्राध्यापक, शरीरविकृतीशास्त्र विभाग | सदस्य |
| ७. | डॉ. विरेश नंदीमठ | सहयोगी प्राध्यापक, जनऔषधवैद्यकशास्त्र विभाग | सदस्य |
| ८. | श्री. परमेश्वर जाधवर | कनिष्ठ लिपीक, विद्याशाखा | सहाय्यक सदस्य |

**<u>वैज्ञानिक आणि शोधनिबंध तपासणी (Scientific & Research paper verification) करीता समितीची कामे-</u>**

- संशोधन लेख, सारांश (Abstract) व शोधनिबंधांचे शैक्षणिक आणि वैज्ञानिक परीक्षण करणे.
- संशोधन कार्याची गुणवत्ता, मौलिकता व उपयुक्तता तपासणे सुधारणा करणे व योग्य शिफारसी करणे.
- परिषद/कार्यशाळा/नियतकालिक प्रकाशन आयोजित करणे व त्यांच्या शैक्षणिक दर्जाचे संवर्धन करणे.
- संशोधन व नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे.
- संशोधनासाठी आवश्यक शैक्षणिक व तांत्रिक निकष पूर्ण झाले आहेत याची खात्री करणे.
- लेखातील तथ्ये, आकडेवारी व लेखकांची माहिती यांची शहानिशा करणे.
- संशोधनासाठी पात्र ठरलेल्या लेखांची अंतिम यादी तयार करणे व अहवाल सादर करणे.
- संपादनानंतरच्या अंतिम प्रतीची तपासणी करणे.
- संशोधनासाठी पात्र ठरलेल्या लेखांना अंतिम मंजुरी देणे.
- वैद्यकीय शिक्षकांच्या पदोन्नतीकरीता उपलब्ध राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या (NMC) मानकांनुसार प्रकाशित संशोधन लेखांची अंतिम पडताळणी करणे.